# अंतरराष्ट्रीय कामगार संघटना, बांधकाम कामगारांची सुरक्षितता आणि भारत – एक दृष्टीक्षेप

अनिल सुभाष झेंडे.१
सहाय्यक प्राध्यापक(कंत्राटी)
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
वाशी, नवी मुंबई

डॉ.व्ही.ए.पाटील२
प्र.प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख.
आर्ट्स आणि सायन्स कॉलेज,आटपाडी.
ता. आटपाडी,जि- सांगली.

**गोषवारा**

असंघटीत कामगार हि औद्योगिक क्रांतीची एक महत्वाची देन म्हणावी लागेल, वाढते शहरीकरण, उद्योग आणि त्याच्या आसपास ऐकवटत असलेला असंघटीत कामगार ह्याचे प्रमाण दिवसागणिक,अर्थव्यवास्थेच्या वाढत्या विकासाबरोबर वाढत चालले आहे,आणि त्याच बरोबर त्यांच्या समस्या ही उग्र होत चालल्या आहेत. असंघटीत कामगारांमध्य प्रामुख्याने सर्वाधिक असुरक्षित व दुर्लक्षित घटक म्हणजे बांधकाम कामगार होय.सातत्याने विस्थापन हा त्यांचा सर्वात महत्वाचा गुणधर्म आहे, आणि त्यामुळे शिक्षन, आरोग्य, कामाची सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता ह्यापासून हा घटक सातत्याने दूर राहिला आहे. बांधकाम कामगार या संकल्पनेची व्याख्या विस्तृत आहे. आर्थिक आणि मानवी आधारावर ह्या सर्वात असुरक्षित घटकाची पिळवणूक थांबविणे व बांधकाम कामगार हा घटक जास्तीत – जास्त सुरक्षित कसा होईल. या अनुषंगाने अंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९३७ पासून अनेक पातळीवर प्रयत्न केले आहेत. भारतामध्ये देखील त्या अनुषंगाने अनेक प्रयत्न झाले आहेत.

**महत्त्वाचे शब्द:** इमारत व इतर बांधकाम कामगार, नियोक्ते, करार, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, नियम व शिफारशी

**प्रस्तावना-**

एकोणिसावे शतक संपून विसावे शतक सुरु होत असताना, औद्योगिक क्रांती युरोपातून संपूर्ण जगभर पसरली. युरोपीय महासत्ता आप- आपल्या वसाहती वर आपली पकड मजबूत करण्यासाठी धडपडत होत्या. त्यातूनच तीसरे जग नावाची विकसनशील व प्रामुख्याने महासत्तांच्या वसाहती म्हणून गणल्या जाणाऱ्या जगाचा उदय होत होता. शिक्षणामुळे तेथील जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती होत होती, प्रचंड असंतोष निर्माण होत असताना तो एकतर दमन करून दाबला जात होता किंवा काही प्रमाणात सुधारणा बहाल करून तो रोष कमी करण्याचा प्रयत्न होत होता. आता सुधारणा म्हणजे काय? रस्ते, रेल्वे, दवाखाने, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, छोटी–मोठी धरणे, कालवे, तार, टपाल, मोठे प्रक्रिया उद्योग, हे वसाहती मध्ये निर्माण होऊ लागले. याचा दुहेरी फायदा सत्ताधारी वर्गास होऊलागला, सत्तेवर मजबूत पकड राहु लागली तसेच कच्चामाल व पक्का माल ह्यांच्या वाहतुकीवरचा खर्च कमी होऊन नफा वाढला. हा नफा युरोपात वाहू लागला आणि वसाहती राष्ट्रांमध्ये कृषक संस्कृती संपून

ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

एक नवा कामगार वर्ग उदयास येऊलागला. आणि हा कामगार वर्ग मग उद्योग धंद्यांच्या आसपास आकृष्ठ होऊलागला, त्यांच्या वस्त्या, राहणीमान, हे अत्यंत गलीच्छ प्रकारचे होते. प्रचंड पिळवणूक आणि माणूस म्हणून असणारे त्यांचे सर्व नैसर्गिक अधिकार नाकारण्यात आले. पुढे कार्ल मार्क्स यांनी ते सिद्ध हि केले, याच विचारसरणीतून पुढे जगभर साम्यवादाचा प्रभाव वाढूलागला जगभर कामगार चळवळी निर्माण झाल्या, रशिया सारखे एक महाकाय साम्यवादी राष्ट्र या सर्वांचे नेतृत्व म्हणून पुढे आले. मग आता फक्त तकलादू सुधारणा कामाच्या नाहीत हे भांडवल दारांच्या ध्यानी येउलागले त्यामुळे अनेक कामगार कायदे उदयास आले, त्यांना पगारी सुट्ट्या, पगारवाढ, सुरक्षितता हे सर्व दिले जाऊ लागले.

पण ह्या कामगार वस्ती वर अवलंबून असणारा किवा प्रत्याक्ष्य उत्पादन प्रक्रियेत नसलेला, किवा कायद्याचे संरक्षण नसलेला असा व पूर्णपणे या वसाहतींवर अवलंबून असलेला असा हि एक वर्ग उदयास आला आणि तो सातत्याने आजही दुर्लक्षित राहिला आहे तो म्हणजे असंघटीत कामगार. उदाहरणार्थ – विस्थापित झालेल्या कामगारांची खानावळ चालवणारे एखादे कुटुंब, अधिकारी वर्गाच्या घरातील घरगडी, मोलकरीण, घराची दुरुस्ती वेगेरे करणारे कारागीर, धोबी, न्हावी, चर्मकार, हातगाडीवाले, फेरीवाले या सर्वांचे जीवन ह्या वस्त्यांवर किंवा कारखान्यांवर अप्रत्यक्ष पणे अवलंबून होते. पण ह्यांच्या साठी कोणताही कायदा, सामाजिक सुरक्षा दिलीगेली नाही. तसे पहिले गेले तर संघटीत कामगारांचे जीवन हे असंघटीत कामगारांमुळेच समृध्द होते आणि आहे.

असंघटीत क्षेत्रत काम करणाऱ्या घटकामध्ये प्रामुख्याने बांधकाम कामगार हा जास्त दुर्लक्षित घटक आहे. त्याच्या कामाचे स्वरूप पाहता तो घटक स्थिर होऊशकत नाही. सातत्याने विस्थापन हा त्यांचा सर्वात महत्वाचा गुणधर्म आहे, आणि त्यामुळे शिक्षन, आरोग्य, कामाची सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता ह्यापासून हा घटक सातत्याने दूर राहिला आहे. त्याच बरोबर प्रचंड पिळवणूक हि त्यांची समस्य आहे. बांधकाम कामगार या संकल्पनेची व्याख्या विस्तृत आहे, यामध्ये गवंडी, सुतार, विटभट्टी कामगार, दगडकाम करणारे कारागीर, वेल्डर, वीजतंत्री, मैदाने बांधणे, देखभाल करणे, धरणे, कालवे, भ्रमणध्वनी मनोरे, विद्युत्पारेषण, इत्यादी सर्व कामांचा समावेश बांधकाम कामगार या संकल्पनेत होतो. आर्थिक आणि मानवी आधारावर ह्या सर्वात असुरक्षित घटकाची पिळवणूक थांबविणे व बांधकाम कामगार हा घटक जास्तीत – जास्त सुरक्षित कसा होईल. या अनुषंगाने अंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९३७ पासून आता पर्यंत जी पाऊले उचलली आहेत त्याचा आढावा ह्या लेखात घेतला गेला आहे.

**उद्दिष्ठे** –

अ.)आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने आजपर्यंत बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी केलेल्या कामाचा आढावा घेणे.

ब.)बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या योजनाच्या अंमलबजावणी संबंधी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे.

क.)बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी संबंधी संशोधनाच्या संधी शोधणे.

- **लेखन साधने** –

सदर लेख हा दुय्याम साधनाच्या आधारे लिहिण्यात आला आहे.

**१. बांधकाम सुरक्षा तरतुदी करार ,१९३७:-**

(Safety Provisions (Building) Convection, 1937 C-62)

२३ जून १९३७ रोजी जिनिव्हा येथील आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मुख्यालयात पार पडलेल्या आमसभेत बांधकाम कामगारांच्या सुरक्षिततेसाठी, तरतूद करण्याचा हा पहिला प्रयत्न होता. बांधकाम कामगारांचे वाढते अपघात हे मानवी आणि आर्थिक आधारावर रोखणे आवश्यक आहे, त्याकारीता मचाण/परांची आणि बांधकाम उपकरणे वापरण्या संबंधी काही शिफारशी करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन हि तरतूद करण्यात आली, सदर तरतुदी मध्ये ५ विभागात एकूण २५ कलमे विभागण्यात आली आहेत, त्या मध्ये.

बांधकाम कामगार व नियोक्ये यांची कर्तव्ये, मचाण/ परांची बांधणी संबंधी चे सामान्य नियम, बांधकाम उपकरणे वापरण्याचे सामान्य नियम,बांधकाम स्थळावर सुरक्षा साधने व प्रथमोपचाराचे सामान्य नियम करण्यात आले.

या तरतुदी पाहता आपल्या लक्षात येईल कि, सुरुवातीस बांधकाम कामगारास सुरक्षितता देण्यासाठी अतिशय मुलभूत गोष्टींची तरतूद आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेला करावी लागली.

**२. बांधकाम सुरक्षा तरतुदी करारा संबंधी शिफारशी १९३७:-**

(Safety Provisions (Building) Recommendation, 1937 , R-53)

बांधकाम सुरक्षा तरतुदी करार ,१९३७ च्या अंमलबजावणी साठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आमसभेत बांधकाम कामगारांच्या सुरक्षितते साठी काही शिफारशी करण्यात आल्या त्या मध्ये. इमारतीतील कामगारांच्या सुरक्षा तरतुदींशी संबंधित काही प्रस्तावांचा अवलंब करण्याबाबत निर्णय घेण्यात आला ज्यामुळे मचान आणि बांधकाम उपकरणांच्या वापरासंबंधी नियम करण्यात आले. सदर नियमांच्या अंमलबजावणीसाठी सदस्य राष्ट्रांनी लवकरात लवकर कायदे बनवावेत, व जी सदस्य राष्ट्रे ह्या तरतुदी स्वीकारणार नाहीत त्या राष्ट्रांनी दर तीन वर्षांनी स्वयंस्पुर्तीने आपल्या राष्ट्रातील बांधकाम कामगारांच्या सुरक्षितते संबंधीची माहिती, या शिफारशीच्या अनुषंगाने द्यावी असे आदेश सदस्य राष्ट्रांना देण्यातत आले आहेत.

**३. बांधकाम तपासणी संबंधी शिफारशी, १९३७:-**

(Inspection (Building) Recommendation, 1937,R-54 )

बांधकाम सुरक्षा तरतुदी करार,१९३७ आणि बांधकाम सुरक्षा तरतुदी करारा संबंधी शिफारशी १९३७ मध्ये श्रम तपासणीसंबंधी तरतुदी आहेत,श्रम तपासणीसंबंधीच्या शिफारशींनुसार बांधकाम उद्योगाच्या बाबतीत उपरोक्त नमूद केलेल्या शिफारशींमध्ये समाविष्ट नसलेल्या काही इतर तरतूदींवर लक्ष केंद्रित करण्यात आले, परिषदेने असे ठरविले की आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या प्रत्येक सदस्याने खालील तत्त्वांचे आणि नियमांचे पालन बांधकामउद्योगाच्या तपासणीसाठी विचारात घ्यावे:

१. सर्व प्रकारच्या इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती, दुरुस्ती, देखभाल आणि बांधकाम पाडणे यांच्या संबंधात सर्व कार्य तपासणीस अधीन असावे.

२. बांधकामाची तपासणी करणे, तसेच कायदे व नियम यांची सक्तीने अंमलबजावणी करण्या करिता सार्वजनिक संस्थाना आवश्यक ते सर्व अधिकार देण्यात यावेत.

३. निरीक्षकांनी तांत्रिक प्रशिक्षण घेतले पाहिजे आणि सर्व उपयुक्त तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींमध्ये निरिक्षक पारंगत असावा जेणेकरून इमारत उद्योगात कार्यरत असलेल्या कर्मचार्यांसाठी सुरक्षा

नियमांचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तो सक्षम असल्याचे सुनिश्चित करावे.

४. तपास प्राधिकरण आणि उपक्रम प्रमुख यांच्यात प्रभावी सहकार्य असावे व ते यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याने बांधील असावेत. जेणेकरून बांधकामाचे सातत्याने पर्यवेक्षन केलेजाईल व सुरक्षा तरतुदींचे पालन केले जाईल. तसेच दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व व्यावहारिक पर्याय आणि विशेषतः दुर्घटनेची जोखीम असणारे काम नाकारण्याच्या संबंधी व तपासणी प्राधिकरणास राष्ट्रीय कायदे किंवा नियमांनुसार, बांधकाम सुरु करत असल्याची माहिती देण्या संबंधी आणि या संदर्भात सक्षम प्राधिकरणाकडे तक्रार करण्यासाठी तपास प्राधिकरण आणि उपक्रम प्रमुख यांच्यात प्रभावी सहकार्य असावे.

४. **बांधकाम अपघात प्रतिबंधासंबंधी सहकार्य शिफारशी,१९३७:-**

(Co-operation in Accident Prevention (Building) Recommendation, 1937 (R.55)

बांधकाम सुरक्षा तरतुदी करार ,१९३७. बांधकाम सुरक्षा तरतुदी करारा संबंधी शिफारशी १९३७, बांधकाम तपासणी संबंधी शिफारशी, १९३७ रक्षा तरतुदी (इमारत) शिफारसी, १९३७, आणि औद्योगिक दुर्घटनांचे प्रतिबंध १९२९ च्या व्यतिरिक्त, सुरक्षा संस्थांच्या माध्यमाने बांधकामातील अपघात टाळण्यासाठी विशिष्ट शिफारशी करणे आवश्यक आहे तेव्हा अंतर राष्ट्रीय कामगार संघटनेने अशी शिफारस केली की आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या प्रत्येक सदस्याने इमारत उद्योगात दुर्घटना प्रतिबंध करण्याच्या बाबतीत काही तत्त्वे आणि नियम विचारात घ्यावेत:

१. बांधकाम उद्योगातील सुरक्षा परिषदेची स्थापना करणे आवश्यक आहे ज्यामुळे बांधकाम क्षेत्रातील दुर्घटनांकडे गांभीर्याने पहिले जाईल.

२. नियोक्ते व बांधकाम कामगार यांचे प्रतिनिधी यांची मिळून प्रत्येक उपक्रमांत, जेथे हे शक्य आहे तेथे नियोक्ता आणि प्रतिनिधींद्वारे एक विशेष सुरक्षा परिषद स्थापन करावी.

३.सक्षम निरीक्षक, नियोक्ता आणि बांधकाम उपक्रमांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या प्रतिनिधींमध्ये सहकार्य असणे आवश्यक आहे.

४. मालक आणि कामगारांचे सुरक्षा संस्था (संयुक्त किंवा स्वतंत्र); कामगार संघटना आणि नियोक्ता संघटना; आर्किटेक्ट्स किंवा अभियंते यांचे संघटन; मानक संघटना, इ .; अपघात विमा संस्था (सार्वजनिक, अर्ध-अधिकृत किंवा खाजगी).निरीक्षक प्राधिकरण आणि संबंधित सर्व संस्थांमध्ये सातत्याने सहकार्य राहिल्यास बांधकाम उद्योगातील सुरक्षे संबंधी प्रचार अधिक प्रभावी होईल:

५. मधील तरतुदी -

(१) संबंधित प्राधिकरणांच्या प्रतिनिधींशी संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे संबंधित कालखंडातील भेटी आणि संबंधित इतर कोणत्याही सार्वजनिक संस्थेच्या प्रतिनिधींनी वेळोवेळी बैठक आयोजित केली पाहिजे.

(२) अशा उद्योगांचे उद्दीष्ट बांधकाम उद्योगात अपघात प्रतिबंधासाठी च्या उपाययोजना सुधारण्यासाठी शक्य असलेल्या पद्धतींचे संयुक्तपणे परीक्षण करणे आवश्यक आहे.

६. तपासणी प्राधिकरणाने आवश्यक तेथे संबंधित सर्व पक्षांशी सहयोग करुन दुर्घटना प्रतिबंधनास प्रोत्साहन द्यावे, जे, प्रात्यक्षिके, बैठका, व्याख्यान आणि चित्रपट अशा स्वरूपात

ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

देणे शक्य आहे. दुर्घटना आकडेवारीचे नुतनीकरण करणे किंवा विश्लेषण करणारी नियतकालिके, पत्रके, मासिके किंवा प्रकाशने वितरीत करणे; आणि पोस्टर्स आणि नोटिसचे वितरण केले गेले पाहिजे.

**५. व्यावसायिक शिक्षण (इमारत) शिफारसी, १९३७:-**

(Vocational Education (Building) Recommendation, 1937 (R.56)-

या शिफारशीनुसार इमारत उद्योगासाठी व्यावसायिक शिक्षणासंदर्भात काही प्रस्तावांचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात आला, दुर्घटनांची जोखीम लक्षात घेऊन, इमारत उद्योगाच्या बाबतीत व्यावसायिक शिक्षण महत्त्वपूर्ण आहे.इमारत उद्योगाशी संबंधित तांत्रिक आणि व्यावसायिक शाळा अभ्यासक्रमामध्ये सैद्धांतिक आणि व्यावहारिक निर्देशांचा समावेश असावा -

(१) मचान तयार करण्यासाठी वापरल्या जाणार्या सामग्री आणि सुरक्षा जाळीची उभारणी व देखभाल करण्याचे तंत्रज्ञान.

(२) इमारत उद्योगात वापरण्यात येणाऱ्या उपकरणांची बांधणी व देखभाल.

(३) बांधकाम स्थळावर सुरक्षा उपायांची तपासणी.

(४) बांधकाम संबंधी कामासाठी सुरक्षा नियम .

या संदर्भात व्यावसायिक शिक्षण (बांधकाम) शिफारसी, १९३७ मध्ये शिफारी करण्यात आल्या.

**६. कामगारांच्या आवासा संबंधी शिफारसी, १९६१:-**

( Workers' Housing Recommendation, 1961 (R. 115)

संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने जागतिक मानवाधिकारांचई घोषणा केली त्यामध्ये प्रत्येकास स्वत: च्या आणि कुटुंबासह आरोग्य व स्वास्थ्यासाठी पुरेसा राहणीमान राखण्याचा अधिकार आहे असे नमूद केले आणि युनायटेड नेशन्स आणि आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने संयुक्त राष्ट्राच्या एकत्रित कार्यक्रमात आणि आर्थिक व सामाजिक परिषदेद्वारे आणि शासकीय नियमाद्वारे,गृहनिर्माण व शहरी आणि राष्ट्रीय नियोजन क्षेत्रामध्ये निर्दिष्ट केल्यानुसार कामगारांच्या आवासा संबंधी शिफारसी केल्या आहेत . परिषदेने अशी शिफारस केली आहे की प्रत्येक सदस्याने त्याच्या सामाजिक आणि आर्थिक धोरणाच्या चौकटीत, खालील सामान्य तत्त्वांचा परिस्थितिनुसार योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे:

ही शिफारस स्व-नियोजित आणि वयस्कर, निवृत्त किंवा शारीरिक अपंग व्यक्तींसह, शारीरिक कष्टाचे आणि अशारीरिक कष्टाचे काम करणाऱ्या कामगारांच्या निवासस्थाना संबंधी आहे.

१. सामान्य गृहनिर्माण धोरणांच्या आराखड्यामध्ये, बांधकाम क्षेत्राशी निगडीत समुदायाच्या सुविधांच्या उभारणीसाठी तसेच, राहणीमान व वातावरण सुनिश्चित करण्यासाठी ह्या शिफारशी राष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टात असाव्यात. सर्व कामगार आणि त्याचे कुटुंबीय यांच्या गर्जना प्राधान्य दिलेगेले पाहिजे .

२. बांधकाम कामगार व त्यांच्यासाठी गृहनिर्माण आणि संबंधित सुविधांची देखभाल, सुधारणा आणि आधुनिकीकरण यावर देखील भर दिला पाहिजे.

३. सर्व बांधकाम कामगारांना चांगला व पुरेसा निवारा, उत्पन्नाच्या प्रमाणात वाजवी भाड्याने देण्याचे उद्दीष्ट असावे.

४. कामगारांच्या गृहनिर्माण कार्यक्रमात बांधकाम क्षेत्रतिल, खाजगी, सहकारी आणि सार्वजनिक उपक्रमांसाठी पुरेसे संधी प्रदान करणे आवश्यक आहे.

५. मोठ्या प्रमाणावर कायमस्वरुपी गृहनिर्माण बांधकाम कार्यक्रम आर्थिक विकासासाठी आणि विकासासाठी थेट स्पर्धा करू शकतात - कारण घरे कुशल आणि अर्ध-कुशल श्रम किंवा कमीतकमी भौतिक संसाधनांसाठी घरे तसेच त्यासाठी आवश्यक असू शकते. उत्पादन क्षमतेच्या विस्तारासाठी आवश्यक इतर प्रकारचे उत्पादन - गृहनिर्माण धोरण सामान्य सामाजिक आणि आर्थिक धोरणासह समन्वयित केले पाहिजे, जेणेकरून कामगारांच्या गृहस्थांना प्राधान्य देण्याची पदवी दिली जाऊ शकेल जी त्यांच्या गरजा आणि आवश्यकता दोन्ही विचारात घेते. संतुलित आर्थिक विकास.

६. प्रत्येक कुटुंबास त्याच्या इच्छेनुसार स्वतंत्र, स्वत: ची निवासी असणे आवश्यक आहे.

७. **व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य शिफारसी, १९८१:-**

(Occupational Safety and Health Recommendation, 1981 (R. 164)

३ जून १९८१ रोजी पारपडलेल्या अंतर राष्ट्रीय कामगार संघटनेच्या आम सभेत, सर्वच क्षेत्रतिल कामगारांसाठी सुरक्षा आणि आरोग्य याविषयी काही शिफारशी करण्यात आल्या. ह्या शिफारशी सर्व आर्थिक क्रियांच्या सर्व शाखा आणि कामगारांच्या सर्व श्रेण्यांवर लागू आहेत. तसेच स्वयंरोजगारीत लोकांसाठी सुध्दा आरोग्य आणि सुरक्षितत या साठी तरतुदी करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले. या मध्ये

**तांत्रिक पातळीवर करण्याच्या कृती-** कामाच्या ठिकाणी ये- जा करण्याचे मार्ग, बैठक व्यवस्था, पुरेसा प्रकाश, वायुवीजन, तापमान आद्रता, कामाच्या ताणामुळे एअर शारीरिक व मानसिक थकवा याचे निर्मुलन, स्वच्छतागृहे, कामगारांच्या आरोग्याची देखभाल, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी योग्य उपाय योजना.

**राष्ट्रीय स्थरावर करण्याच्या कृती-** कामाचे तास, विश्रांतीची वेळ,व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य आणि कामकाजाच्या वातावरणावरील इतर योग्य तरतूदी, या संबंधी कायदे करणे. तसेच वेळोवेळी व्यावसाईक सुरक्षा आणि आरोग्य यांचा आढावा घेतला जावा. कामातील धोके ओळखण्यासाठी आणि त्यांचा सामना करण्याच्या उपायांचा शोध घेण्यासाठी अभ्यास आणि संशोधन करा

योग्य प्रकारे, नियोक्त्यांना आणि कामगारांना माहिती आणि सल्ला पुरविणे आणि त्यांना आणि त्यांच्या संस्थांच्या दरम्यान सहकार्य करणे किंवा सुविधा प्रदान करणे, धोके दूर करणे किंवा व्यावहारिक म्हणून कमी करणे यासाठी; जेथे योग्य असेल तेथे विस्थापित श्रमिकांसाठी त्यांच्या मातृभाषेत एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम पुरविला जावा. आपत्ती टाळण्यासाठी विशिष्ट उपाय प्रदान करणे आणि समन्वय करणे आणि विविध स्तरांवर कारवाई करणे आवश्यक आहे, विशेषतः औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगार आणि आसपासच्या लोकसंख्येसाठी जास्त धोकादायक उपक्रम आहेत. अपंग( दिव्यांग) कामगारांसाठी योग्य उपाययोजना केल्या जाव्यात

**शिफारशी कशाप्रकारे अंमलात आणल्या जाव्यात-** कामाच्या ठिकाणी, यंत्रसामग्री आणि उपकरणे पुरविणे आणि त्यांची देखभाल करणे आणि योग्य पद्धतींचा वापर करणे ज्यामुळे सुरक्षितता आणि आरोग्यास कोणताही धोका नाही. विविध श्रेणीतील कामगारांना त्यांची कार्ये आणि क्षमतांचा तपशील घेऊन आवश्यक सूचना व प्रशिक्षण देणे.कामाचे वेळोवेळी निरिक्षण केले जावे. व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य तसेच उपक्रमाचा आकार, पर्यावरण

यांच्या देखरेखीसाठी संस्थात्मक संरचना करावी. आपत्कालीन परिस्थितीत वापरावयाचे पुरेसे वैयक्तिक सुरक्षात्मक कपडे आणि उपकरणे जे तातडीने आवश्यक असतात ते कामगारांना कोणत्याही खर्चाशिवाय कामगारांना देण्यात यावेत. नियोक्ते कामगारांचे कामाचे तास व सुरक्षितता यांच्याशी प्रतारणा करत नाहीत याची खात्री करावी. अत्याधिक शारीरिक आणि मानसिक थकवा दूर करण्याच्या दृष्टीने सर्व सर्व त्या उपाययोजना करव्यात व या शिफारशींचा या पूर्वीच्या शिफारशींवर होणारा परिणाम याचे विस्तृत्त विवेचन करण्यात आले आहे.

**८. बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार,१९८८:-**

(Safety and Health in Construction Convention, 1988 (C- 167)

बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार,१९८८ चा, प्रभाव पुढील करार आणि शिफारशींवर पडणार आहे.

१. बांधकाम सुरक्षा तरतुदी करार आणि शिफारसी, १९३७,
२. दुर्घटना प्रतिबंध (इमारत) शिफारसी, १९३७,
३. किरणोत्सार प्रतिबंध करार आणि शिफारसी, १९६०,
४. यंत्र हाताळणी करार व शिफारसी, १९६३,
५. कमाल वजन करार आणि शिफारसी, १९६७,
६. व्यवसायिक कर्करोग करार आणि शिफारसी, १९७४,
७. पर्यावरण (वायु प्रदूषण, ध्वनी व कंपन) करार आणि शिफारसी, १९७७,
८. व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य करार आणि शिफारशी १९८१,
९. व्यावसायिक आरोग्य सेवा करार आणि शिफारसी, १९८५,
१०. एस्बेस्टोस करार आणि शिफारसी, १९८६,
११. १९८० मध्ये सुधारित केलेल्या व्यावसायिक आजारांची यादी.
१२. रोजगार दुखापती करार १९६४.

बांधकाम कामगारांच्या सुरक्षिततेे विषयी आणि आरोग्यासंबंधीच्या काही प्रस्तावांचा अवलंब करण्याच्या संबंधी निर्णय घेताना, बांधकाम सुरक्षा तरतुदी करार ,१९३७ मध्ये सुधारणा करण्यासाठी हा करार करण्यात आला.

यामध्ये करारामध्ये एकूण ४४ कलमे ५ विभागात विभागली आहेत.

या करारातील तरतुदी लागू करण्यासाठी नियोक्ते व बांधकाम कामगार यांनी वेळोवेळी सल्लामसलत करावी.कामगारांच्या सुरक्षिततेे साठी योग्य कायदे केले जावेत व त्यांची कठोर अंमलबजावणी केली जावी. राष्ट्री कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपयोजना केल्या जात आहेत का ह्याची पाहणी केली जावी. राष्ट्रीय कायदे किंवा नियमांनुसार नियोक्ता आणि स्वयंरोजगार असलेल्या व्यक्तींना कामाच्या ठिकाणी निर्धारित सुरक्षितता आणि आरोग्य उपायांचे पालन करणे आवश्यक आहे

या करारानुसार परांची संबंधी सुधारित नियम ठरविण्यात आले. तसेच बांधकाम उपकरणे जसे यारी, तराफ इत्यादि च्या बांधणी तसेच देखभाल.वाहतूक, खुदाई, इत्यादी कामे, कारखाने, यंत्रे, उपकरणे,यांची हाताळणी. चाट तसेच इतर उंचावरील कामे. बोगदे, गगनचुंबी इमारती, ठिकाणी धूळ, वारा यांची गुणवत्ता. बंदिस्त हवेतील कामे.पाण्यावर केली जाणारी कामे. बांधकाम पडण्याची कामे, कामाच्या ठिकाणी प्रकाशाच्या सोई, वीज पुरवठा. विस्फोटकांचा वापर,आरोग्यास घटक कामे, अग्नी प्रतिबंधन वैयक्तिक सुरक्षा साधने, प्रथमोपचार, प्रसाधनगृह, माहिती व प्रशिक्षन, अपघात व आजार यासंबंधी

माहिती देणे या संबंधी तरतुदी करण्यात आल्या. व सदस्य देशांनी यांची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य पाऊले उचलावीत असे निर्देशित करण्यात आले.

**९. बांधकाम सुरक्षितता आणि आरोग्य शिफारशी, १९८८:-**

(Safety and Health in Construction Recommendation, 1988 (R.175)

या शिफारशी द्वारे बांधकाम सुरक्षा तरतुदी करार आणि शिफारसी,१९३७, बांधकाम अपघात प्रतिबंधासंबंधी सहकार्य शिफारशी, १९३७ रद्द करण्यात आल्या व बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार,१९८८ च्या अंमलबजावणी साठी बांधकाम सुरक्षितता आणि आरोग्य शिफारशी,१९८८ या शिफारशी करण्यात आल्या.

**१०. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्थी) अधिनियम -१९९६:-**

(The building and other construction workers (regulation of employment and conditions of service) act, 1996)

आंतरराष्ट्रीय कामगार संघटच्या बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार,१९८८ ला अनुसरून भारत सरकारने १९६९ इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्थी) अधिनियम -१९९६ पारीत केला. व त्याद्वारे बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय मानके स्वीकारली. या मध्ये –

१. केंद्रस्तरावर सल्लागार समिती. (कलम –३)
२. राज्यस्तरीय सल्लागार समिती. (कलम-४)
३. तज्ञ समिती (कलम-५)
४. इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ (कलम- १८) प्रत्येक राज्याने निर्माण करण्याचे आदेश देण्यात आले. व या मंडळानी काय काम करावे हयासंबंधी कलम –२२ मध्ये सांगण्यात आले आहे. त्यानुसार–

१. दुर्घटनेच्या बाबतीत नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांना तत्काळ सहाय्य प्रदान करा;
२. साठ वर्षांपासून पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना पेंशन देणे.
३. नियमानुसार घरांच्या बांधकामासाठी लाभार्थीला कर्ज देणे.
४. नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांचा गट विमा उतरविणे व त्याचे हप्ते भाराने.
५. लाभार्थींच्या मुलांच्या शिक्षणासाठी अशा आर्थिक सहाय्य देणे.
६. लाभार्थीच्या गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय खर्च करणे.
७. बांधकाम कामगारांना किवा त्याच्या पत्नीसाठी मातृत्व लाभ योजना राबविणे.
८. इतर कल्याणकारी योजना राबविणे.

हि मंडळाची कार्ये निर्धारित केली गेली आहेत.

**११. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६:-**

(The building and other construction workers' welfare cess act, 1996)

मंडळानी विविध योजना राबविण्या साठी करावयाचा खर्चाची तरतूद म्हणून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ पारित करण्यात आला, त्याच्या कलम ३ (१), नुसार जमिनीची किंमत वगळता बांधकामाच्या एकूण खर्चाच्या १% दराने उपकार वसूल करण्यात आली आहे. व त्याचा विनियोग योजना राबविण्यासाठी करण्यात येतो.

**१२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ:-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्थी) अधिनियम -१९९६ कलम १८ (१) नुसार प्रत्येक राज्याने त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करणे आवश्यक आहे.तथापि, महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक ०४.०८.२००७ अन्वये प्रथमत: ५ शासकीय सदस्यांची नियुक्ती महाराष्ट्र

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर करण्यात आली,तदनंतर दिनांक १ मे २०११ व २८ मे २०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे परिपुर्ण त्रिपक्षीय मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. यामध्ये शासन प्रतिनिधी, मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांचा समावेश आहे. मंडळाकडे बांधकाम कामगार, नियोक्ते यांच्या नोंदी करणे अनिवार्य आहे.

कामगार म्हणून नोदणी करण्यासाठी १८ ते ६० वर्षे वयोगटातील मागील बारा महिन्यांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेले कामगार पत्र आहेत.

आस्थापनांची नोंदणी करण्यासाठी, कोणत्याही दिवशी १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार कामावर ठेवणाऱ्या अशा सर्व आस्थापना की, ज्यात केंद्र व राज्य शासनांच्या संस्था, स्वायत्त संस्था, सिंचन, रेल्वे, विमान प्राधिकरण, म्हाडा, सिडको, एम.आय.डी.सी., सर्व नगरपालिका महानगरपालिका, टेलिफोन, विद्युत पारेषण, पूर नियंत्रण, बोगदे, पूल, इमारत, रस्ते, मार्ग, नेव्हीगेशन काम, तेल व वायूची जोडणी टाकणे, वायरलेस / रेडीओ / टेलिव्हिजन टॉवर्स इ. बांधकामे करणाऱ्या सर्व आस्थापनांचा समावेश होतो.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या - सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यात एकुण सुमारे 14.09 लाख इतके बांधकाम कामगार होते. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येत १५.९९% झालेली वाढ विचारात घेता ढोबळमानाने बांधकाम कामगारांची संख्या १७.५० लाख इतकी अपेक्षित आहे.याचप्रमाणात सन २०१६ पर्यंत बांधकाम कामगारांची महाराष्ट्र राज्यातील संख्या सुमारे १९ लाख अपेक्षित आहे.राज्यात फेब्रुवारी, २०१७ अखेर ५.९३ लाख बांधकाम कामगारांची लाभार्थी म्हणून मंडळात नोंदणी झाली असून त्यातील २.९८ लाख कामगारांची नोंदणी जिवीत आहे.

**१३. , बांधकाम कामगार व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर कायदा, 1 99 6 अंतर्गत बांधकाम कामगारांसाठी कल्याण योजनांचे सुधारित सेवा वितरणा संबंधी चर्चा पत्र (२०१०) –**

सन- २००९ मध्ये, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २००८ सालच्या जागतिक मंदीचा भारतातील बांधकाम क्षेत्रावरील परिणामाचा आढावा घेण्यासाठी एक मूल्यांकन अभ्यास सुरू केला, व त्यातून जी तथ्ये समोर आली ती या चर्चा पत्राद्वारे प्रकाशित करण्यात आली.सुमारे २८ दशलक्ष कुशल आणि अकुशल कामगार (नियोजन आयोग -२००५) भारतातील बांधकाम क्षेत्रामध्ये गुंतलेली आहे. त्यांची संख्या सुमारे ४0 दशलक्ष असल्याचा अंदाज आहे.सध्या ते असंघटित क्षेत्रतिल सर्वाधिक असुरक्षित कामगार म्हणून गणले जातात. कामाचे तत्पुरते स्वरूप कामगार व नियोक्ते यांच्यातील अस्पष्ट संबंध यामुळे ते अधिक असुरक्षित बनले आहेत. त्यांच्या जीवितास आणि शारिरीक धोके हे इतर संघटीत व असंघटीत क्षेतत्रातील कामगारांच्या तुलनेत सर्वाधिक आहेत. बहुतेक बांधकाम कामगार हे विस्थापित आहेत. बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेशमधील, छत्तीसगढ, राजस्थान आणि भारतातील इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातून भूमिहीन मजूर बांधकाम कामगार म्हणून दिल्ली, मुंबई सारख्या इतर शहरांमध्ये आपल्या

जगण्यासंबंधीच्या गरजा भागविण्यासाठी विस्थापित झाला आहे. त्यापैकी बहुतांश बांधकाम कामगार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती मधील आहेत. त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत शेती आहे पण शेतीमध्ये काम नसल्यामुळे हा वर्ग बांधकाम क्षेत्राकडे वळला आहे. आणि त्या पैकी सर्वच लोकांना बांधकाम कामगारांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्यांचा लाभ मिळालेला नाही. विशेषतः **इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम**, १९९६.कमी बांधकाम गतिविधीमुळे, मजुरी दराच्या बाबतीत कामगारांचे शोषण होत आहे, जादा कामाचे पैसे व इतर भत्ते दिले जात नाहीत. मंदीमुळे ज्या कामगारांनी नोकरी गमावली आहे अशा कामगारांसाठी सामाजिक विमा / संरक्षण प्रदान करण्याची आवश्यकता आहे. बांधकाम कामगार (रोजगाराचे नियमन आणि सेवा शर्ती) अधिनियम, १९९६ आणि **इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम**, १९९६ अंतर्गत इमारत आणि इतर बांधकाम कामगारांची नोंदणी करणे आवश्यक आहे ज्यामुळे कायद्याच्या तरतूदीनुसार बांधकाम कामगारांना कल्याणकारी लाभ मिळवू शकेल. अजूनही काही राज्यांमध्ये बांधकाम कामगार (रोजगाराचे नियमन आणि सेवा शर्ती) अधिनियम, १९९६ कायद्यांची अंमलबजावणी झाली नाही तसेच बांधकाम कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यासाठी अद्याप नियम तयार केलेले नाहीत. अनेक राज्यात जेथे कल्याण मंडळाची स्थापना झाली आहे तेथे निधी गोळा करणे व तो पूर्णपणे वापरलाजाणे आवश्यक आहे. विस्थापित कामगार वर्गात महिला कामगारांची स्थिती सर्वात वाईट आहे. अशा प्रकारे, बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनानच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात अनेक मुद्दे समोर आले त्यापैकी -

आस्थापनांची नोंदणी (अद्याप आंशिक) (ब) कामगारांची नोंदणी (अनेक राज्यांत कमी) (क) उपकर संग्रहन (अद्याप आंशिक) (ड) निधीचा वापर (अनेक राज्यांमध्ये अगदी कमी) आहे. व यावर उपाय म्हणून आस्थापनांची नोंदणी वाढविणे, कामगारांची नोंदणीवाढविणे, उपकर संग्रहन योग्यप्रकारे करणे,निधीचा वापर योग्यप्रकारे करणे हे उपाय सुचविण्यात आले.सदर चर्चा पत्रात आंध्र प्रदेश,मध्य प्रदेश,गुजरात,दिल्ली,हरियाणा,कर्नाटक,बिहार या राज्यांमध्ये स्थापन झालेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला आहे पण महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना १ मे २०११ रोजी झाली असल्याने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामगिरीचा आढावा ह्या पत्रात घेतला जाऊशकला नाही.

- **निष्कर्ष** –

आंतरराष्ट्रीय कामगार संघटने ची स्थापना २९ अक्टोबर १९१९ रोजी झाली, तेव्हा पासून आज पर्यंत संघटीत तसेच असंघटीत कामगारांना सुरक्षा प्रदान करण्या करिता अनेक करार केले आहेत,त्या पैकीच बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी सन १९३७ साली सर्व प्रथम पावले उचलण्यात आली. त्यातून बांधकाम सुरक्षा तरतुदी करार,१९३७ उदयास

आला. या कराराच्या अंमलबजावणी साठी १) बांधकाम सुरक्षा तरतुदी करारा संबंधी शिफारशी १९३७, बांधकाम तपासणी संबंधी शिफारशी, १९३७ बांधकाम अपघातप्रतिबंधासंबंधी सहकार्य शिफारशी, १९३७, बांधकाम अपघात प्रतिबंधासंबंधी सहकार्य शिफारशी, १९३७, व्यावसायिक शिक्षण (इमारत) शिफारसी, १९३७ करण्यात आल्या. पुढे १६६१ मध्ये कामगारांच्या आवासा संबंधी शिफारसी करण्यात आल्या ज्या जागतिक मानवी हक्काच्या सनदेस अनुसरून होत्या. आणि त्या बांधकाम क्षेत्रास देखील लागू पडत होत्या. १९८१ मध्ये व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य शिफारसी करण्यात आल्या ज्यामध्ये कामगारांच्या आरोग्यावर त्यांच्या व्यवसायामुळे होणारा परिणाम व त्याचे प्रतिबंधन यावर भर देण्यात आला. मात्र बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार,१९८८ मध्ये मात्र फक्त बांधकाम कामगारांच्या व्यावसाईक आरोग्य टिकविण्यासाठी काय करावे हे सुचविण्यात येऊन त्या कराराची अंमलबजावणी सुरु झाली. व बांधकाम संबंधी आरोग्य आणि सुरक्षा करार कशा प्रकारे अंमलात आणला जावा हे बांधकाम सुरक्षितता आणि आरोग्य शिफारशी, १९८८ मध्ये सुचविण्यात आले.

अंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९३७ सालासापासून प्रामुख्याने बांधकाम कामगार तसेच असंघटीत कामगार म्हणून,बांधकाम कामगारांना सुरक्षा प्रदान करण्यासंबंधी सातत्याने पुढाकार घेतला आहे. याचाच परिणाम म्हणून भारतामध्ये सन १९९६ साली "इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्थी) अधिनियम -१९९६" पारित कण्यात आला. व बांधकाम कामगारांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी ठोस पाऊले उचलण्यात आली.सदर कायद्याची प्रभावी अंमल बजावणी होताना दिसते.जवळपास भारतातील सर्वच राज्यात इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची स्थापना झाली आहे. व हि मंडळे विविध प्रकारच्या योजना राबवून बांधकाम कामगारांना सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीने काम करत आहेत.

मंडळ राबवत असलेल्या योजना आणि इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची बांधकाम कामगारांच्या विकासातील भूमिका, बांधकाम कामगारांच्या नोंदणी तील अडचणी, योजनांच्या अंमलबजावणी मधील अडचणी, उपकार निर्धारण व वसुली यातील अडचणी. यामध्ये पुढील संशोधन करण्यास वाव आहे. लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून "Role of construction workers welfare board for their betterment in Maharashtra" या विषयात विद्यावाचस्पती साठी संशोधन करीत आहे.

- **संदर्भ:-**

१. **International Labour Organization, Safety Provisions (Building) Convention, 1937 (C62)** *Convention concerning Safety Provisions in the Building Industry (Entry into force: 04 Jul 1942) Adoption: Geneva, 23rd ILC session (23 Jun 1937) - Status: Outdated instrument (Technical Convention).Convention may be denounced: 04 Jul 2022 - 04 Jul 2023.*

२. **International Labour Organization, Safety Provisions (Building) Recommendation, 1937 (R 53)** *Recommendation concerning Safety Provisions in the Building Industry Adoption: Geneva, 23rd ILC session (23 Jun 1937).*

३. **International Labour Organization ,Inspection (Building) Recommendation, 1937 (R 54)** *Recommendation concerning Inspection in the Building Industry Adoption: Geneva, 23rd ILC session (23 Jun 1937).*

४. **International Labour Organization , Co-operation in Accident Prevention (Building) Recommendation, 1937 (R 55)** *Recommendation concerning Co-operation in Accident Prevention in the Building Industry Adoption: Geneva, 23rd ILC session (23 Jun 1937).*

५. **International Labour Organization, Vocational Education (Building) Recommendation, 1937 (R 56),** *Recommendation concerning Vocational Education for the Building Industry Adoption: Geneva, 23rd ILC session (23 Jun 1937).*

६. **International Labour Organization ,Workers' Housing Recommendation, 1961 (R 115)** *Recommendation concerning Workers' Housing Adoption: Geneva, 45th ILC session.*

७. **International Labour Organization, Occupational Safety and Health Recommendation, 1981 (R 164),***Recommendation concerning Occupational Safety and Health and the Working Environment Adoption: Geneva, 67th ILC session*

८. **International Labour Organization, Safety and Health in Construction Convention, 1988 (C 167),***Convention concerning Safety and Health in Construction*

९. **International Labour Organization, Safety and Health in Construction Recommendation, 1988 (R 175).**

१०. **International Labour Organization, ILO DWT for South Asia and Country Office for India, (2010)** *Discussion Paper, Improved Service Delivery of Welfare Schemes for the Construction Workers under the Building and Other Construction Workers Welfare Cess Act, 1996.*

११. **Government of India(1996) The Building And Other Construction Workers (Regulation Of Employment And Conditions Of Service) Act, 1996.**

- **वेब लिंक:-**

१. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=NORMLEXPUB:12100:::NO:12100:P12100_ILO_CODE:C062:NO
२. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=NORMLEXPUB:12100:0::NO::P12100_INSTRUMENT_ID:312312
३. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=1000:12100:8345478801823::NO::P12100_SHOW_TEXT:Y:
४. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=NORMLEXPUB:12100:0::NO::P12100_ILO_CODE:R054
५. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=1000:12100:8345478801823::NO::P12100_SHOW_TEXT:Y:
६. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=1000:12100:8345478801823::NO::P12100_SHOW_TEXT:Y:
७. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=1000:12100:::NO:12100:P12100_INSTRUMENT_ID:312453
८. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=1000:12100:::NO:12100:P12100_INSTRUMENT_ID:312502
९. https://www.ilo.org/dyn/normlex/en/f?p=NORMLEXPUB:55:0:::55:P55_TYPE,P55_LANG,P55_DOCUMENT,P55_NODE:REC,en,R175,/Document
१०. https://mahabocw.in/index.php
११. https://mahabocw.in/